लोकसंवादातून–विकासाकडे

फेब्रुवारी–मार्च २०१२

# विकासवेध

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे मुखपत्र





वार्ड क्र.१ मधील गुंठेवारी भागातील विविध विकास कामांचे उद्‌घाटन ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्याहस्ते झाले. यावेळी महापौर इद्रिस नायकवडी, माजी आमदार दिनकरतात्या पाटील, श्रीनिवास पाटील, मकरंद देशपांडे, शितल पाटील, संजय बजाज, श्रीनिवास पाटील, नगरसेविका विमल हिप्परकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



रघुवंश सोसायटी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाचे भूमिपूजन ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार संभाजी पवार, आमदार प्रकाश शेंडगे, आमदार रमेश शेंडगे, तत्कालिन महापौर प्रा. नितीन सावगावे, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, नगरसेवक विष्णू माने, मनगू सरगर, शहाजी कोकरे, सुभाष गोयकर यांच्यासह सन्मा. नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते.

● वर्ष पहिले ● अंक चौथा ●

● फेब्रुवारी - मार्च २०१२ ● पृष्ठे २० ●

RNI No. MAHAMAR39815/11-TC

लोकसंवादातून-विकासाकडे

विकासवेध

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिकेचे मुखपत्र

मुख्य संपादक
**द.प.मेतके-देशमुख**
आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

संपादक
**चंद्रकांत आडके**
प्र.नगरसचिव तथा जनसंपर्क अधिकारी,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

टीम विकासवेध
**विजय कुलकर्णी**, उपायुक्त
**नितीन कापडणीस**, उपायुक्त
**सुनिल नाईक**, सहा.आयुक्त
**विद्या पोळ**, सहा.आयुक्त

**संपादकीय पत्ता**
जनसंपर्क अधिकारी कार्यालय
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका,
महापालिका मुख्यालय, शहर पोलिस स्टेशन समोर
सांगली ४१६४१६
दूरध्वनी : ०२३३-२३७३७२१ /२३७३७२२

ई-मेल : smkcorporation@gmail.com
वेबसाईट : www.smkc.gov.in
फक्त एसएमएस : ९०११०२९७३४

# संपादकीय

सांगली, मिरज आणि कुपवाड महापालिका क्षेत्रातील गुंठेवारीचा सर्वांगीण विकास करणे हे महापालिका प्रशासनापुढे मोठे आव्हान आहे. महापालिकाक्षेत्राचा विस्तार ११८ चौरस किलोमिटर आहे. ही महाराष्ट्रातील ड वर्ग महापालिकांमध्ये विस्ताराने सर्वात मोठी महापालिका आहे. महापालिकाक्षेत्रामध्ये गुंठेवारीचे प्रमाण अधिक असल्यामुळे गुंठेवारीतील समस्या अनेक आहेत. विकास महाआघाडीची सत्ता महापालिकेत आल्यानंतर गुंठेवारीतील नागरीकांना जास्तीत जास्त नागरी सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. गुंठेवारीत रस्ते, गटारी, लाईट इत्यादी सुविधा देण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू असून गुंठेवारी भागाचा विकास व गुंठेवारीभागात मुलभूत व पायाभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठीचे नियोजन करण्यात आलेले आहे. महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता गुंठेवारीतील नागरीकांना सोई-सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता भासत आहे. विकास महाआघाडीचे नेते ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांचे माध्यमातून शासनस्तरावरून गुंठेवारीसाठी भरीव निधी आणण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. गुंठेवारी भागातील मुख्य रस्ते तसेच गटारीच्या कामासाठी प्रशासनाने २८ कोटीचा आराखडा तयार करून तो शासनास सादर केला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये त्यापैकी किमान १० कोटीचा निधी महापालिकेस मंजूर होण्याची शक्यता आहे. शासनाकडून सदरचा निधी उपलब्ध झाल्यास गुंठेवारीतील नागरीकांना नागरीसुविधा पुरविण्यास प्रशासन गती देवू शकेल.

**- चंद्रकांत आडके**
संपादक.

'विकासवेध' हे पत्रक प्रकाशक व संपादक चंद्रकांत मारूती आडके यांनी मालक सांगली, मिरज व कुपवाड शहर महापालिका यांच्याकरीता मुद्रक राजेंद्र वसंतराव शिंदे यांच्या विक्रांत प्रिंटींग प्रेस १६८२, खणभाग सांगली ४१६४१६ (महाराष्ट्र) येथे छापून 'विकासवेध' कार्यालय, सांगली, मिरज व कुपवाड शहर महापालिका मुख्य कार्यालय, सांगली ४१६४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद सांगली न्यायालयाच्या कक्षेत)



**इद्रिस नायकवडी**
महापौर

# प्रश्न आपले उत्तर महापौरांचे

## तुमच्या मनात खालील प्रश्न आहेत काय?

आसपासच्या रस्त्यांच्या दुरावस्थेचे प्रश्न...
रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांचे प्रश्न...
पिण्याच्या पाणी पुरवठ्यासंबंधीचे प्रश्न...
सार्वजनिक आरोग्यासंबंधीचे प्रश्न...
सार्वजनिक कामासंबंधीचे प्रश्न...

**तुम्हाला महापालिकेच्या कामासंबंधी असे कोणतेही प्रश्न पडत असतील, तर जरूर लिहा... आपल्या प्रश्नांची उत्तरे स्वत: महापौर देतील.**

पत्ता : संपादक 'विकासवेध'
**जनसंपर्क अधिकारी कार्यालय**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
महापालिका मुख्यालय, शहर पोलिस स्टेशन समोर
सांगली ४१६४१६
दूरध्वनी : ०२३३-२३७३७२१ /२३७३७२२

# चिंतामणीनगरमध्ये नाना-नानी पार्क



**संध्याकाळी शांत, रम्य ठिकाणी फिरायला जावे, नातवंडांना खेळवावे, जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटून मन मोकळे करावे आणि आयुष्यातील प्रत्येक संध्याकाळ संस्मरणीय करावी, हे जेष्ठ नागरीकांचे स्वप्न साकार व्हावे, यासाठी विकास महाआघाडीचे नेते ग्रामविकासमंत्री जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वार्ड नं. ३ मध्ये नाना-नानी पार्क साकारण्याचा निर्णय झाला. नगररसेवक शितल पाटील यांच्या प्रयत्नातून या पार्कचे काम गतीने सुरू आहे. या पार्कचे काम पूर्ण होत असल्याचे पाहून नागरीकांतून समाधान व्यक्त होत असून हे नाना-नानी पार्क सांगली शहरातील वैशिष्ट्यांमध्ये भर घालणारा आहे.**

वार्ड नं. ३ मधील नागरीकांसाठी परिसरामध्ये विरूंगुळ्याचे ठिकाण नव्हते. त्यामुळे चिंतामणीनगर येथील डवरी झोपडपट्टीचे पुनर्वसन झाल्यानंतर त्या ठिकाणच्या महापालिकेच्या खुल्या भूखंडावर जेष्ठ नागरीक व बालोपाळांसाठी नाना-नानी पार्क करावा अशी या वार्डातील नागरीकांची मागणी होती. त्यानुसार नगरसेवक शितल पाटील यांनी ना. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून त्याठिकाणी नाना-नानी पार्क करण्यासाठी अंदाजपत्रकात रूपये १० लाखांची तरतूद केली व त्यामधुन पार्कच्या कामास सुरूवात झाली. सुमारे एक एकर जागेमध्ये हा पार्क साकारला जात असून त्यामध्ये पहिल्या टप्प्यात जॉगींग ट्रॅक, ॲक्युप्रेशर ट्रॅक, प्रशस्त लॉन, विविध प्रकारची शोभिवंत फुलझाले, कंपौंड, वॉटर पॉन्ड इत्यादीची व्यवस्था करण्यात आली आहे. अद्यापही

काही कामे दुसऱ्या टप्प्यात करण्यात येणार असून त्यासाठी सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पात तरतूद सुचविण्यात आली आहे. या नाना-नानी पार्कचा लोकार्पण सोहळा महाआघाडीचे नेते ग्रामाविकास मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते दि.८ मार्च रोजी झाला. यावेळी बोलताना ग्रामविकास मंत्री जयंत पाटील म्हणाले की, हा वार्ड विकासापासून वंचीत होता. परंतु महाआघाडी सत्तेवर आल्यानंतर या वार्डच्या विकासाला आम्ही चालना दिली आहे. या वार्डाचे अनेक वर्षांचे प्रलंबीत प्रश्न मार्गी लावण्याचा प्रमाणिक प्रयत्न आम्ही करीत आहोत. या भागातील साठफुटी रस्त्याचा प्रश्न, औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी निचऱ्याचा प्रश्न, तसेच गुंठेवारी व अविकासीत भागात सुविधा देण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्राधान्य देत आहोत. या भागातील नागरीकांना विरंगुळ्यासाठी सोय नव्हती त्यासाठी आम्ही या ठिकाणी नाना-नानी पार्क करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असुन दुसऱ्या टप्प्यामध्ये या ठिकाणी आणखी सुविधा देण्याचा आम्ही प्रयत्न करू. ते पुढे म्हणाले की, चांगल्या शहरात ही व्यवस्था आवश्यक बनली असुन या ठिकाणी कमी जागेत जास्तीत जास्त सुविधा केल्या आहेत. नाना-नानी पार्कमुळे या जागेचा सदुपयोग झालेला आहे.

यावेळी बोलताना महापौर इद्रिस नायकवडी यांनी नाना-नानी पार्कचे काम उत्कृष्ट झाल्याचे नमूद केले. तर माजी आमदार दिनकरतात्या पाटील यांनी आपल्या मनोगतात शहराच्या वैशिष्ट्यात भर घालणारा नाना-नानी पार्क असलेचे प्रतिपादन केले.



**नाना-नानी पार्कच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी कोनशिलेचे अनावरण महाआघाडीचे नेते ग्रामाविकास मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार दिनकरतात्या पाटील, माजी महापौर सुरेश पाटील, प्राथमिक शिक्षण मंडळाचे सभापती प्रा.पद्माकर जगदाळे, गुंठेवारी विकास समितीचे सभापती शितल पाटील, नगरसेवक दिग्विजय सुर्यवंशी उपस्थित होते.**

## सांगली, मिरज आणि कुपवाड महापालिकेचे

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारक

**सांगली, मिरज व कुपवाड शहर महापालिकेच्यावतीने साकारत असलेले राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाचे काम गतीने सुरू असून ३१ मे २०१३ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा निर्धार सत्ताधारी विकास महाआघाडीने केला आहे. संपूर्ण देशामध्ये आदर्श राज्यकारभार करणाऱ्या तसेच गरीब जनतेची आपल्या सत्ताकाळात सेवा करणाऱ्या महान महिला राज्यकर्तीचे स्मारक महापालिकाक्षेत्रात व्हावे अशी तमाम नागरीकांची इच्छा होती. त्यानुसार विकास महाआघाडीचे नेते ग्रामविकास मंत्री ना.जयंत पाटील यांनी सांगलीमध्ये स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला.**



ना. जयंत पाटील यांनी तत्कालीन महापौर नितीन सावगावे यांना स्मारकाचे अनुषंगीक प्रस्ताव तसेच डिझाईन करून घेण्याचे आदेश दिले. तत्कालीन महापौर नितीन सावगावे यांनी पुढाकार घेवून स्मारकासाठी वानलेसवाडी येथील रघुवंश सोसायटीमधील ३२ गुंठे जागेची निवड केली. तसेच याकामी महापालिकेच्या अंदापत्रकात ७८ लाखांची तरतूद केली. सांगलीतील प्रसिध्द वास्तुविशारद प्रमोद चौगुले यांचेकडून स्मारकाचे डिझाईन तयार करून घेण्यात आले. स्मारकामध्ये अहिल्यादेवीचे जीवन चरीत्र दर्शन, भित्तीशिल्प, वस्तूसंग्रहालय, अहिल्यादेवींचा पुतळा, सभामंडप, स्टेजव्यवस्था, वाचनालय, कुंड व कारंजा तसेच लॉन व बगीचा या बाबींचा समावेश आहे.

स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाचे उद्घाटन ग्रामविकासमंत्री जयंत पाटील यांच्या शुभहस्ते व माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, आमदार संभाजी पवार, आमदार प्रभाकर घारगे, आमदार रमेश शेंडगे, आ. प्रकाश शेंडगे, तत्कालीन महापौर नितीन सावगावे, उपमहापौर शेखर इनामदार, स्थायी समितीचे सभापती महादेव कुरणे, आयुक्त दत्तात्रय मेतके यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १ फेब्रुवारी २०११ रोजी रघुवंश सोसायटी येथे करण्यात आले होते.

यावेळी ग्रामविकासमंत्री जयंत पाटील म्हणाले की, अहिल्यादेवीचे स्मारक एक आदर्श स्मारक व्हावे तसेच सांगली शहरातील पर्यटनस्थळ म्हणून या स्मारकाची ओळख व्हावी अशा पध्दतीने स्मारक उभारण्याचा आम्ही संकल्प केलेला असून या स्मारकासाठी निधी कमी पडू देणार नाही. यावेळी आ. प्रभाकर घारगे, आ. रमेश शेंडगे, आ. प्रकाश शेंडगे, आ.संभाजी पवार, आ. निलम गोऱ्हे यांनी या स्मारकासाठी आमदार फंडातून निधी देण्याचे जाहीर केले.

ना. जयंत पाटील यांचे प्रेरणेतून साकारत असलेल्या या स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी माजी महापौर नितीन सावगावे, नगरसेवक विष्णू माने, मनगु सरगर, शहाजी कोकरे, सुभाष गोयकर, वंदना सायमोते व संगीता खोत हे सन्मानिय सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत. अहिल्या देवींचे स्मारक महापालिका क्षेत्रातील एक उत्कृष्ट पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याचा


प्रयत्न महापलिका करीत आहे. त्यास महापालिकेतील सर्व पदाधिकारी नगरसेवक अधिकारी यांचे बहुमोल सहकार्य मिळत आहे. आतापर्यंत या स्मारकामचे पहिल्या टप्प्यात सभामंडप, कार्यालय, गेस्टरूम, वाचनालय, संग्रहालय इमारत, पाण्याचे कुंड, पुतळ्याचा चबुतरा याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम येत्या दोन महिन्यात पूर्ण होईल. दुसऱ्या टप्प्यात स्मारक परिसराला कंपौंड वॉल, लॉन, पाथवे, चित्रशिल्प बसविणे, बागबगीचा करणे इ. कामे होणार आहेत. सदर स्मारकाचे काम ३१ मे, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला असून स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाची निवीदा या महिन्यात काढण्यात येत आहे.



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या कामाचे उद्‌घाटन ग्रामविकामंत्री ना. जयंत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार रमेश शेंडगे, तत्कालीन महापौर नितीन सावगावे, नगरसेविका संगीता खोत उपस्थित होते.**

---

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाचे रेखाचित्र



# ना. जयंत पाटील यांच्या हस्ते गुंठेवारी भागातील विविध विकास कामांचे उद्घाटन



महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी भागांचा विकास व भागातील पायाभूत सुविधांसाठी आपण कटीबध्द असल्याचे प्रतिपादन महाआघाडीचे नेते ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनी वार्ड क्र. १ मधील विविध विकास कामांचे उद्घाटन प्रसंगी केले.

नगरसेविका विमल हिप्परकर यांच्या वार्डातील विविध विकास कामाचे उद्घाटन ना. जयंत पाटील यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, विकास महाआघाडीला गुंठेवारी भागातून जास्त प्रतिसाद मिळाला होता. नगरसेविका विमल हिप्परकर यांनी वार्ड क्र. १ मधून विजय मिळवून महाआघाडीचे खाते उघडले होते. वार्ड क्र. १ नावाप्रमाणेच विकासामध्येही नंबर एक असून विमलताईंच्या पुढाकाराने वार्डामध्ये एक कोटींची विकास कामे झाली आहेत. यापुढील कामासाठी भरीव निधी देण्यात येईल. गुंठेवारी भागातील विकास कामांसाठी आम्ही २८ कोटींच्या विशेष निधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. मी स्वत: मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व अर्थमंत्री अजित पवार यांच्याबरोबर चर्चा केली असून गुंठेवारीसाठी किमान १० कोटीचा निधी मिळेल अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. येत्या दीड वर्षात सर्व कामाचा पाठपुरावा करून गुंठेवारी विकास कामाला चालना दिली जाईल. गुंठेवारीतील विकास कामांना प्राधान्य देण्यात येईल. असेही ते म्हणाले. माजी आमदार दिनकरतात्या पाटील म्हणाले की, या भागातील पाण्याच्या पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे या भागातील पाण्याचा प्रश्न संपलेला आहे. या भागामध्ये रस्ते मुरमीकरण, खडीकरण झाले आहे. आता यापुढे डांबरी रस्ते व गटारी करण्यासाठी निधीची तरतूद करू. महापौर इद्रिस नायकवडी म्हणाले की, विमलताईंच्या वार्डातील विकास कामे करण्यासाठी येत्या अंदाजपत्रकात भरीव निधीची तरतूद करू. विशाल हिप्परकर यांनी आपल्या प्रास्ताविकात वार्डातील झालेली कामे व अद्याप प्रलंबीत असलेली कामे व समस्या मांडल्या. कार्यक्रमास स्थायी समिती सभापती मकरंद देशपांडे, गुठेवारी समिती सभापती शितल पाटील, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष योगेंद्र थोरात, ग्राहक संघटना राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष दामाजी कारंडे, शिक्षण मंडळ सदस्य मानसिंग शिंदे, माजी नगरसेवक संजय बजाज, राष्ट्रवादी सांगली विधानसभा क्षेत्र अध्यक्ष श्रीनिवास पाटील, उपायुक्त विजय कुलकर्णी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नामदेव हारगे, विक्रम खोत, विनायक मुगळे, पोपट पवार, विशाल सुडके, प्रकाश जाधव, महेश सुपेकर, रामदास खोत, गणेश कदम, सचिन जाधव या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नविन जेटरॉडमशिन व शववाहिका महापालिकेच्या ताफ्यात दाखल




महानगरपालिकेच्या मिरज विभागीय कार्यालयामध्ये नव्याने दाखल झालेल्या जेटरॉडमशिन व शववाहीकेचे उद्घाटन महापौर इद्रिस नायकवडी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती मकरंद देशपांडे, प्रभाग समिती क्रमांक ४चे सभापती अल्लाऊद्दीन काझी, उपायुक्त नितीन कापडणीस उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज भूमीगत गटर योजना (अंडरग्राऊंड ड्रेनेज स्किम) तत्कालीन मिरज नगरपरीषद कालवधीमध्ये सन १९७१ पासून कार्यरत आहे. सदर योजना ८०,००० लोकसंख्येसाठी करणेत आलेली होती. तद्नंतर लोकसंख्येमध्ये वाढ झालेली असलेने या ड्रनेज लाईन चोकअपचे प्रमाण वाढले आहे. तसेच सुमारे १२ वर्षापूर्वी खरेदी केलेले एकमेव जेटरॉड मशीन हे महापालिकाक्षेत्रासाठी अपूरे पडत असल्याने एका नवीन मशीनची तातडीने आवश्यकता होती. ती याद्वारे पूर्ण झालेली आहे. सदरचे जेटरॉड मशीन हे अत्याधुनीक असून १३० बार या उच्च दाबाने पाण्याचा झोतजेट अंडरग्राऊंड ड्रेनेज पाईप लाईनमध्ये मारून चोक काढणेत येतो. तसेच स्वयंचलित हॅड्रोलीक सिस्टीमद्वारे याचे काम चालते. या मशिनकरीता आलेला सुमारे रूपये ३३ लाखाचा खर्च हा शासकीय अनुदानातून १२ व्या वित्त आयोगाचे निधीमधून करण्यात आला आहे. सदर नविन जेटरॉड मशिनचा दैनंदीन वापरामधून ड्रेनेज लाईन चोकअपचे प्रमाण कमी होवून रस्त्यावरून वाहणारे सांडपाण्याचा त्रास कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच ड्रेनेज पाईप लाईनचे आयुष्यमान वाढण्यास उपयुक्त ठरणार आहे.

तसेच मिरज विभागामध्ये कार्यरत असलेली शववाहिका एका वर्दीस जावून परत येईपर्यंत दरम्यानचे कालावधीमध्ये दुसऱ्या वर्दीस जाणेकरीता होणारा विलंब टाळण्याकरीता व कार्यरत शववाहिकेचा वापर १० वर्षापेक्षा अधिक झालेने एक नविन सुसज्ज शववाहिका खरेदी करण्यात आलेली आहे. त्याकरीता सुमारे ११ लक्ष रूपये इतका खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करण्यात आला आहे.

# वित्तआयोगातून महापालिकेस भरीव निधी देवू:

## महाराष्ट्र वित्तआयोग अध्यक्ष जे.पी.डांगे यांची ग्वाही



महापालिकेने जनताभिमुक प्रशासन द्यावे त्यासाठी महापालिकेच्या पायाभूत नागरी सुविधांसाठी राज्य वित्त आयोगातून भरीव निधी दिला जाईल, अशी ग्वाही महाराष्ट्र वित्त आयोगाचे अध्यक्ष जे. पी. डांगे यांनी वित्त आयोगातून महापालिकाक्षेत्रात सुरू असलेल्या कामाचा आढावा घेताना दिली.

महापालिकच्या कै. राजाभाऊ जगदाळे सभागृहात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी महापौर इद्रीस नायकवडी, स्थायी समिती सभापती मकरंद देशपांडे, आयुक्त दत्तात्रय मेतके-देशमुख, उपायुक्त विजय कुलकर्णी, नितीन कापडणीस, शिक्षण मंडळ सभापती प्रा. पद्माकर जगदाळे, महिला बाल कल्याण सभापती अश्वीनी कुलकर्णी, प्रभाग समितीचे सभापती अल्लाउद्दीन काजी, शहाजी कोकरे, गुंठेवारी समिती सभापती शितल पाटील यांच्यासह नगरसेवक व खातेप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

वित्त आयोगाचे अध्यक्ष जे. पी. डांगे यांनी महापालिकेला भेट देऊन महापालिका क्षेत्रात १२ व्या व १३ व्या वित्त आयोगातून झालेल्या व सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. यावेळी महापालिकेच्यावतीने महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या विविध प्रकल्पाच्या माहितीचे संगणकीय सादरीकरण करण्यात आले.

यावेळी जे. पी. डांगे म्हणाले, सध्या राज्यामध्ये शहरीकरण वाढत असल्याने शहरातील नागरी समस्याही वाढत आहेत. महापालिकेकडून नागरीकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहे. त्यासाठी महापालिकेने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली पाहिजे. विकास कामे करताना प्रशासकीय तांत्रीक तसेच वैधानिक अडचणी येत असतात, त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. घटनेमध्ये आता महापालिकांना स्वतंत्र अस्तित्व देण्यात आले आहे. त्यामुळे रिस्पॉन्सीव्ह सीटी गर्व्हमेंट देण्याचे काम महापालिकेचे आहे. त्यासाठी महापालिकेने सर्व नगरसेवकांकडून त्यांच्या वार्डातील विविध विकास कामाची माहिती घेऊन त्यानुसार एक मेमोरेडम तयार करून त्यास महासभेची मान्यता घेऊन तो शासनाकडे पाठवावा. त्याबाबत शासन स्तरावर जरूर तो विचार होऊन निधी उपलब्ध करून दिला जाईल. केंद्रीय वित्त आयोगाप्रमाणेच राज्य वित्त आयोगाचा महापालिकेला चांगला फायदा होईल.

यावेळी महापालिकेचे शिक्षण मंडळ सभापती प्रा. पद्माकर जगदाळे यांनी शिक्षण मंडळाच्या शाळांना कंपौंडसाठी निधी, शिक्षकांच्या १०० टक्के वेतनासाठी निधीची मागणी केली. गुंठेवारी सभापती शितल पाटील यांनी विकासासाठी २८ कोटीचा निधी मागितला. मागासवर्गीय समितीच्या सभापती पुष्पा सोनवणे यांनी मागासवर्गीय निधी अपूरा पडत असल्याने निधी वाढवून देण्याची मागणी केली.

पाणीपुरवठा अभियंता व शहर अभियंता यांनी गॅप फंडींगसाठी विशेष निधीची तरतूद करण्याची मागणी केली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राम हंकारे यांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेत निधी कमी पडत असल्याने घनकचरा व्यवस्थापनावर परिणाम होत असलेने निधी वाढवण्याची मागणी केली.

यावेळी बोलताना महापौर इद्रीस नायकवडी यांनी वित्त आयोगाचे अध्यक्ष जे. पी. डांगे यांनी महापालिकेस भेट देऊन आढावा घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच गॅप फंडींगसाठी सक्षम तोडगा काढण्याची मागणी केली. महापालिका आयुक्त द. प. मेतके-देशमुख म्हणाले की, महापालिकेच्या अस्थापना खर्चातून विकास कामासाठी निधी कमी पडतो डीपीडीसीमधुन जादा निधी मिळावा व त्यासाठी डीपीडीसी मधील २३ टक्केची अट रद्द करावी. अशी मागणी त्यांनी केली. यावर निश्चित तोडगा काढण्याचे अश्वासन जे. पी. डांगे यांनी दिले. स्वागत प्रास्ताविक उपायुक्त विजय कुलकर्णी यांनी केले तर आभार उपायुक्त नितीन कापडणीस यांनी मानले. यानंतर जे. पी. डांगे यांनी महापालिकेच्या विविध विकास कामांची पहाणी केली.

# सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत वाहन वितरण

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत लाभार्थी रावसाहेब सिताराम खांडेकर यांना टाटा छोटा हत्ती या टेम्पोची चावी महापौर इद्रिस नायकवडी यांच्याहस्ते प्रदान करण्यात आली.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेतील कुटुंबांना या स्वयंरोजगार योजनेचा लाभ देण्यात येतो. नगरसेवक विष्णू माने यांच्या मार्गदर्शनाखाली वार्ड क्रमांक २४ मधील शामनगर येथील लाभार्थी रावसाहेब सिताराम खांडेकर यांना भारतीय स्टेट बँक कुपवाड शाखेच्यावतीने कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. दोन लाख रूपयांचे कर्ज प्रकरण मंजूर करण्यात आले असून महापालिकेच्यावतीने २५ टक्के प्रमाणे ५० हजार रूपये अनुदान स्वरूपात सबसीडी देण्यात आली.

चावी प्रदान समारंभास स्थायी समितीचे सभापती मकरंद देशपांडे, गटनेते किरण सुर्यवंशी, उपायुक्त विजय कुलकर्णी, नगरसेवक विष्णु माने, हणमंतराव पवार, मनगू सरगर, नगरअभियंता आर.पी. जाधव, सहाय्यक आयुक्त सौ. विद्या पोळ, जनसंपर्क अधिकारी चंद्रकांत आडके, प्रकल्प संचालक शिरीष काळे, सौ. वंदना सव्वाखंडे उपस्थित होते.



**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत लाभार्थी रावसाहेब सिताराम खांडेकर यांना टाटा छोटा हत्ती या टेम्पोची चावी महापौर इद्रिस नायकवडी यांच्याहस्ते प्रदान केल्यानंतर श्रीफळ फोडून गाडीचे पुजन करण्यात आले. यावेळी स्थायी समितीचे सभापती मकरंद देशपांडे, गटनेते किरण सुर्यवंशी, उपायुक्त विजय कुलकर्णी, नगरसेवक विष्णु माने, हणमंतराव पवार, मनगू सरगर, नगरअभियंता आर.पी. जाधव, सहाय्यक आयुक्त सौ.विद्या पोळ, जनसंपर्क अधिकारी चंद्रकांत आडके, प्रकल्प संचालक शिरीष काळे, सौ. वंदना सव्वाखंडे उपस्थित होते.**

# एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करणाऱ्या

# दांम्पत्याचा महापालिकेच्यावतीने सत्कार

मुलगा नसतानाही एका किंवा दोन मुलींवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दांम्पत्यांचा सत्कार महापौर इद्रीस नायकवडी यांच्याहस्ते करण्यात आला.

सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांच्या मुलींकरीता विशेष प्रोत्साहनपर योजना राबविण्यात येत आहे. महापालिकाक्षेत्रात यावर्षी दोन मुलींवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रीया केलेल्या मिनाक्षी प्रकाश हातपाळे (सांगली), अनुराधा संतोष जाधव (सागंली), रंजना दत्तात्रय माने (मिरज) यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. दोन मुलींवर शस्त्रक्रीया करून घेणाऱ्यांच्या मुलींच्या नावे रूपये चार हजार प्रत्येकी असे आठ हजार रूपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र तसेच मातेस रोख रूपये दोन हजार रूपये व एका मुलीवर शस्त्रक्रीया करून घेतलेल्यांच्या मुलीच्या नावे आठ हजार रूपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र व मातेस रू. दोन हजार असे प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यात आले.

यावेळी महिला व बालकल्याण सभापती सौ.अश्विनी कुलकर्णी, आयुक्त दत्तात्रय मेतके–देशमुख, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राम हंकारे उपस्थित होते.




**मुलगा नसतानाही एका किंवा दोन मुलींवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दांम्पत्यांचा धनादेश देवून महापौर इद्रीस नायकवडी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण सभापती सौ. अश्विनी कुलकर्णी, आयुक्त दत्तात्रय मेतके–देशमुख, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राम हंकारे उपस्थित होते.**

# अपंगांना कृत्रीम अवयव वाटप




महापलिकेच्या महिला व बालकल्याण समिती व आरोग्य विभाग यांच्यावतीने घेण्यात अलेल्या अपंग आरोग्य तपासणी व कृत्रीम अवयव वाटप शिबीरामध्ये तपासणी केलेल्या सहा अपंगांना महापौर इद्रीस नायकवडी यांच्याहस्ते कृत्रीम अवयव वाटप करण्यात आले.

महिला बालकल्याण समितीच्या सभापती अश्विनी कुलकर्णी, आयुक्त दत्तात्रय मेतके–देशमुख, नगरसेविका वंदना सायमोते, सुमन कदम, आय.सी.डी.एस. प्रकल्प अधिकारी श्री. तेवरे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.राम हंकारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या शिबीरात तपासणी करण्यात आलेल्या अपंगांपैकी एकूण १७ अपंग कृत्रीम अवयवासाठी पात्र ठरले होते. त्यापैकी फक्त अकरा अपंगांना महाराष्ट्र विकास परिषदेमार्फत साधने वाटप करण्यात आली होती. त्यामुळे उर्वरीत सहा अपंगांना आवश्यक असलेले कृत्रीम अवयव महापालिकेने कृत्रीम अवयव तज्ञांकडून तयार करून घेऊन त्यांचे वाटप केले.



# सदृढ पिढीच्या निर्मितीसाठी पोलिओ मुक्ती गरजेची

## महापौर इद्रिस नायकवडी यांचे प्रतिपादन



महापालिकाक्षेत्र पोलिओमुक्त करण्यासाठी तसेच येणारी पिढी आरोग्यदायी व सदृढ बविण्यासाठी सर्व नागरीकांनी आपल्या पाच वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओ डोस द्यावा, असे आवाहन महापौर इद्रिस नायकवडी यांनी महापालिकेच्या पोलिओ लसीकरण मोहिमेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

सागंली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने पल्स पोलिओ लसीकरण मोहिम सन २०११-१२ अंतर्गत प्रथम सत्राच्या पल्स पोलिओ मोहिमेस महापालिक्षेत्रात उत्स्फुर्त प्रतिसद मिळाला. मोहिमेचे उद्घाटन महापौर इद्रीस नायकवडी व विरोधी पक्षनेते मुन्ना कुरणे यांच्याहस्ते सांगली येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतिगृहातील लसीकरण केंद्रावर करण्यात आले. उपायुक्त विजय कुलकर्णी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राम हंकारे व नगरसचिव चंद्रकांत आडके या प्रमुख उपस्थितांच्या हस्ते बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आले. यावेळी वैद्यकिय अधिकारी डॉ. सुचेता पवार व डॉ. वर्षा पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. महापालिका कार्यक्षेत्रात २४४ लसीकरण बुथची स्थापना करण्यात आली होती. तसेच जकात नाके, टोल नाके, एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी ट्रॅन्झिट टिमद्वारे व मोबाईल टिमद्वारे प्रथम सत्रात बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आले. महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेकरीता ४९८०० चे पल्स पोलीओ दिवशी उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी पल्स पोलिओ दिवशी ९७ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले व उर्वरीत वंचित बालकांना पोलिओ डोस देण्याकरीता घरभेटीद्वारे १८९ टिममार्फत महापालिकेने नियोजन करून शंभर टक्के उद्दीष्ट पूर्ण केले.

गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रात पोलिओचा एकही रूग्ण आढळून आलेला नाही. तसेच गेल्या ९ वर्षात महापालिकाक्षेत्रात पोलिओचा रूग्ण आढळलेला नाही. हे या मोहिमेचे यश आहे. या मोहिमेचा चांगला उपयोग होत असलेने या मोहिमेमध्ये सर्व नागरीकांनी आपल्या पाच वर्षाखालील बालकांना पोलिओचा डोस पाजुन घ्यावा व येणारी पिढी आरोग्यदायी व सदृढ बनविण्यासाठी सर्वांनी या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन महापौर इद्रीस नायकवडी यांनी केले. आरोग्य विभागाचे राज्यस्तरीय पर्यवेक्षक डॉ. सी. जी. शिंदे यांनी महापालिकेच्या पोलिओ बुथला भेटी देवून पोलिओ मोहिमेचे पर्यवेक्षण केले. महापालिकेचा पोलिओ डोस कार्यक्रम व्यवस्थिपणे पार पडल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# महिला बालकल्याण समितीच्या सदृढ बालक स्पर्धांना उत्स्फुर्त प्रतिसाद



महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्यावतीने पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती व बालदिना निमित्त महापालिका क्षेत्रात दहा ठिकाणी सदृढ बालक स्पर्धेचे आयोजन सभापती अश्विनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

महिला बालकल्याण समिती व महापालिकेच्या आर.सी.एच. प्रकल्प यांचे संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धा महापालिका शाळा क्र. १ सांगलीवाडी, महापालिका शाळा क्र.२४ जामवाडी, महापालिका दवाखाना वडर कॉलनी, वृत्तपत्र विक्रेता संघ हॉल सांगली, विजयनगर जिमखाना हॉल, महापालिका दवाखाना मिरज, सिंधी हॉल मिरज, दिंडीवेस मिरज, जिल्हा परिषद शाळा नं १ कुपवाड या ठिकाणी पार पडल्या.

वय वर्ष १ ते ३ या वयोगटासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत एकूण १०५३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक आर. सी. एच्. हेल्थपोष्ट निहाय झालेल्या या स्पर्धेतील विजेते स्पर्धक पुढील प्रमाणे,

सागंलीवाडी आरोग्य केंद्र या हेल्थ पोष्ट अंतर्गत महापालिका शाळा क्रमांक ९ सांगलीवाडी येथे झालेल्या स्पर्धेत ८० बालकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम – श्लोक सुजित कोठावळे, द्वितीय– तन्वी विवेक कांबळे, तृतीय– माधुरी अनिल कोळी असे यश मिळविले. साखर कारखाना येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत महापालिका शाळा क्र.२४ जामवाडी येथे ९६ बालकांनी स्पर्धेत सहभाग

घेतला यामध्ये प्रथम–श्रावणी सचिन सुर्यवंशी, द्वितीय–ईश्वरी प्रशांत पाटील, तृतीय–हर्षवर्धन दादासो तांबे यांनी यश मिळविले. शिवाजीनगर येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत महापालिका दवाखाना क्र.७ वडर कॉलनी, सांगली येथे स्पर्धा झाली यामध्ये ४० स्पर्धक सहभागी झाले. यात प्रथम–विधी विनायक जगताप, द्वितीय–प्रणिती प्रविण वाइंगडे, तृतीय–कार्तिक विजय आवळे असे क्रमांक मिळाले. रमामातानगर येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत वृत्तपत्र विक्रेता संघ हॉल सांगली येथील स्पर्धेत १३० स्पर्धकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम–आदित्य मोहन केसरे, द्वितीय–समिक्षा दिपक मोहिते, तृतीय–रिया सागर जेठाणी यांनी यश मिळविले. विश्रामबाग येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत झालेल्या स्पर्धेत ७० स्पर्धकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम–अर्पिता चंद्रकांत कांबळे, द्वितीय–हर्षवर्धन विजय सातपुते, तृतिय–वेदांत युवराज केसरे यांनी यश मिळविले. मिरज अर्बन येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत महापालिका दवाखाना लक्ष्मी मार्केट समोर मिरज येथे झालेल्या स्पर्धेत १३१ बालकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम–अनुराधा अजित कडोले, द्वितीय–हर्षदा शिवाजी पाटील, तृतीय–विक्रांत विनायक पाटील यांनी यश मिळविले, इदगाहनगर येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत  सिंधी हॉल परिट गल्ली सांगली येथे झालेल्या स्पर्धेत १४० स्पर्धकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम–सेजल सचिन गायकवाड, द्वितीय–डॅनी राजु होळकर, तृतीय–पार्थ गजानन माळी यांनी यश मिळविले, इंदिरानगर येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत विठ्ठल मंदिर दिंडीवेस मिरज येथे झालेल्या स्पर्धेत १७७ स्पर्धकांनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम–प्राची उत्तम बावडेकर, द्वितीय–पवन संजय मोटगी, तृतीय–गिरीष संतोष जाधव, कुपवाड येथील हेल्थ पोष्ट अंतर्गत जल्हा परिषद शाळा नं १ कुपवाड या ठिकाणी झालेल्या स्पर्धेत ७५ बालक सहभागी झाले होते, यामध्ये प्रथम–वसुंधरा मोरे, द्वितीय अनुराग दाणेकरी तर तृतीय–श्रेयसी घोडके यांनी यश मिळविले.

या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी १००१ रूपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५१ रूपये व तृतीय क्रमांकासाठी ५०१ रूपये, अशी रोख बक्षीसे तसेच खेळणी वाटप करण्यात आली. त्याच बरोबर स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व बालकांना खाऊ व खेळणी वाटप करण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्य, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राम हंकारे तसेच आर.सी.एच.कडील सर्व लेडी मेडीकल ऑफीसर व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले. परीक्षक म्हणुन डॉ.उज्वला गवळी, डॉ.रोहिणी कुलकर्णी, डॉ.बबन गोसावी, डॉ.सचिन शहा यांनी काम पाहिले.



सदृढ बालक स्पर्धेसाठी उपस्थित माता व बालके

# महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या शालेय क्रीडा स्पर्धा संपन्न




**क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांच्याहस्ते क्रीडाज्योत प्रज्वलीत करून करण्यात आले. यावेळी महापौर इद्रिस नायकवडी, सभापती प्रा.पद्माकर जगदाळे, उपसभापती तानाजी व्हनकडे, अनिल पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. सांगलीतील छत्रपती शिवाजी स्टेडियमवर दोन दिवस या स्पर्धा अत्यंत उत्साही व जल्लोषी वातावरणात सुरू होत्या. महापालिकाक्षेत्रातील महापालिका शाळांतील सुमारे ७०० हुन अधिक विद्यार्थी-विद्यार्थीनींनी या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग घेतला होता.**

राष्ट्रकुल स्पर्धेच्या थाटात या शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन अगदी आगळ्यावेगळ्या दिमाखदार पध्दतीने थाटामाटात करण्यात आले. स्पर्धेच्या सुरूवातीलाच खेळाडूंनी पाच गटात संचलन करून उपस्थित मान्यवरांना आपली शिस्त लष्करी शिस्त असल्याचे दाखवून दिले. मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आलेली शांततेचे प्रतिक असलेली कबुतरे तसेच क्रीडांगणावर झेपावणारे रंगीबेरंगी असंख्य मोठमोठे फुगे, जणू काही आंतराष्ट्रीय स्पर्धाच सुरू होत असल्याचा भास होत होता. जिल्हाधिकारी श्याम वर्धने व महापौर इद्रिस नायकवडी यांच्याहस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून या स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

याप्रसंगी राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई यांच्यासह विविध राष्ट्रपुरूषांच्या वेषभूषा केलेल्या विद्यार्थीनी मैदानावर लक्षवेधी ठरल्या. तर प्राथमिक शाळेतील मुलांच्या झांझपथकाने व मुला-मुलींच्या लेझीम पथकाने आपल्या सादरीकरणाने क्रीडा रसिकांची मने जिंकली.

## महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिध्द केली : जिल्हाधिकारी श्याम वर्धने

जिल्हाधिकारी श्याम वर्धने या क्रीडा उत्सवाचे नियोजन पाहून अगदी भारावून गेले होते. त्यांनी या शालेय विद्यार्थ्यांची शिस्त पाहून त्यांचे तोंड भरून कौतुक केले. ते म्हणाले, महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता दाखवून दिली आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ पहात असताना अक्षरश: राष्ट्रकुल स्पर्धेचाच अनुभव घेत असल्यासारखे आपणास वाटले. विद्यार्थ्यांना लहान वयात मिळालेले शिस्तीचे आणि जिद्दीचे बाळकडू त्यांच्या आयुष्यभर प्रेरणा देईल. असे प्रतिपादन श्याम वर्धने यांनी केले.

## गरीबांच्या मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा उपक्रम अभिमानास्पद : महापौर इद्रिस नायकवडी

महापौर इद्रिस नायकवडी यांनी यावेळी बोलताना, गरीबांच्या मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा शिक्षण मंडळाचा प्रयत्न अभिमानास्पद आहे. शिक्षण मंडळच्या माध्यमातून शाळा चांगल्या प्रकारे सुधारत आहेत. परंतु महापालिकेकडून त्यांना हवी तेवढी मदत मिळू शकलेली नाही. परंतु यापुढे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून शिक्षण मंडळाला विशेष आर्थिक मदत देण्यासाठी तसेच खेळाडूंना लागणारे कीट देण्याबाबतही अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असे सांगून, आजचा हा क्रीडा सोहळा महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे. असेही ते म्हणाले.

## खासगी शाळांनाही मागे टाकू : प्रा.पद्माकर जगदाळे

शिक्षण मंडळाचे सभापती प्रा.पद्माकर जगदाळे यांनी अत्यंत भावनावश होत आपल्या महापालिकेच्या मुलांच्या विकासाबाबत असलेली कळकळ व्यक्त केली. ते म्हणाले, शिक्षणमंडळासाठी निधी मागायचे आम्ही आता बंद केले आहे. आमचे नेते ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनी महाराष्ट्रातील शाळा सुधारण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यामध्ये आम्ही शिक्षण मंडळाच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलत आहोत. त्यासाठीच या क्रीडा स्पर्धा भरविण्यात आल्या आहेत. सर्वांच्या सहयोगाने हे शिक्षणमंडळ कार्यरत आहे. सुधारणेचे सर्व श्रेय हे शिक्षकांना आहे, अशाच पध्दतीने जर शिक्षकांनी योगदान दिले तर आम्ही खाजगी शाळांनाही मागे टाकू. असा विश्वास प्रा.पद्माकर जगदाळे यांनी व्यक्त केला.

यावेळी महापालिकेचे गटनेते किरण सुर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे सांगली विधानसभा क्षेत्र अध्यक्ष श्रीनिवास पाटील, माजी महापौर सुरेश पाटील, शालेय क्रीडा समितीचे सदस्य बाळासाहेब आळतेकर, नगरसेवक हरिदास पाटील, बाळासाहेब गोंधळी, शिक्षण मंडळ सदस्य रवि खराडे, कयुम पटवेगार, वहिदा नायकवडी,प्रशासन अधिकारी अनिल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. उपसभापती तानाजी व्हनकडे यांनी आभार मानले.

## स्पर्धेचे संयोजन

क्रीडाधिकारी मंगल फोंडे-मगदूम, क्रीडाप्रमुख अर्जुन गावडे, अविनाश मस्के, म.जा. पाटील, बी. एम्. पाटील, श्री. माळी आदी शिक्षकांनी केले.

**सांघिक खेळ प्रकारात विजेते व उपविजेते पद पटकाविलेले संघ असे.**

**मोठा गट खो खो-** शाळा क्र. २३ सांगली, शाळा क्र. १८ मिरज, मुली - शाळा क्र.१ सांगली, शाळा क्र. २३ सांगली, कबड्डी लहान गट - मुले- शाळा क्र. ९ सांगली, शाळा क्र. दोन सांगली, मुली- शाळा क्र. १३ मिरज, शाळा क्र.२३ मिरज,

**वैयक्तिक मैदानी खेळ प्रकारात पहिले तीन आलेले विद्यार्थी असे, लांबउडी मुले-** रोहन कंजरभाट,शाळा क्र. १८ मिरज,सिध्दाप्पा लोगाई,शाळा क्र.१८ मिरज, शिवाजी चलवादी,शाळा क्र.३८सांगली,

**लांबउडी मुली-** स्वप्नाली खोत, शाळा क्र. १ सांगली, निकीता साठे, शाळा क्र. २१ मिरज, सोनाली गवाणे, शाळा क्र. २३ सांगली, **गोळाफेक -** सिध्दाप्पा लोगाई, शाळा क्र. १८ मिरज, अजय रूपनर शाळा क्र. ३६ सांगली, मुली - लुबाना सय्यद, शाळा क्र. २३ मिरज, पूजा वडीगेर,

शाळा क्र.१८ मिरज, **उंचउडी मुले–** सिध्दाप्पा लोगाई,शाळा क्र.१८ मिरज, अजय रूपनर शाळा क्र.३६ सांगली, **उंचउडी मुली –** निकीता साठे शाळा क्र. २१ मिरज, रूपा दोडमनी शाळा क्र.१८ मिरज, स्वप्नाली खोत शाळा क्र.१ सांगली, **मतिमंद, कर्णबधीर, अपंग** विद्यार्थ्यांच्या स्पर्धानांही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला वेगवेगळ्या खेळ प्रकारात पहिले तीन आलेले विद्यार्थी असे, **५० मिटर धावणे**, **मतिमंद प्रवर्ग मुले–** शोएबअख्तर खान शाळा क्र.२३ मिरज, प्रणिता प्रविण कांबळे, शाळा क्र.२३ मिरज आणि तुषार प्रशांत सकटे शाळा क्र.४ सांगली, **५० मिटर धावणे मतिमंद मुली –** रमिझा मकबुल गुवारकर, अल्फिया मकबुल गुवारकर, फिझा मकबुल गुवारकर, शाळा क्र.१०.

**सॉप्टबॉल थ्रो, मतिमंद प्रवर्ग –** प्रणिता कांबळे, शोएबअख्तर खान,शाळा क्र. २३ मिरज, तुषार सकटे शाळा क्र.४ सांगली, **लांबउडी मतिमंद मुले–** शोएबअख्तर खान, प्रणिता कांबळे, तुषार सकटे, फिझा मकबुल गुवारकर,शाळा क्र.१०, **सॉप्टबॉल थ्रो मुली–** फयझा अकील भालदार,शाळा क्र.१०, रमिझा मकबुल गुवारकर, शाळा क्र.१०, **लांबउडी मतीमंद मुली –** रमिझा मकबुल गुवारकर, फिझा मकबुल गुवारकर,शाळा क्र.१०, कर्णबधिर गट ५० मिटर धावणे – मुले – सुदर्शन इरकर, ओंकार राजेंद्र गायकवाड, शाळा क्र. १४ **सॉप्टबॉल थ्रो–** सुदर्शन इरकर, विजयनगर प्राथमिक शाळा, यशवंतनगर, ओंकार राजेंद्र गायकवाड शाळा क्र.१४, **लांबउडी–** सुदर्शन थरकर, ओंकार राजेंद्र गायकवाड **५० मीटर धावणे–** सरिता शामराव कदम, निशा बलराम केवट, गीता तुकाराम चुरी, द.ह.चव्हाण कन्याशाळा सांगलीवाडी, **सॉप्टबॉल थ्रो–** निशा बलराम केवट, सरिता शामराव कदम; गीता तुकाराम चुरी;द.ह.चव्हाण कन्याशाळा सांगलीवाडी. **लांबउडी –** निशा बलराम केवट, सरिता शामराव कदम, गीता तुकाराम चुरी,द.ह.चव्हाण कन्याशाळा सांगलीवाडी. **५० मिटर धावणे अपंग – मुले–** अभिजीत संजय निकम, अक्षय प्रकाश पाटील, राहुल लकाप्पा कुंभार; सर्व मिरज हायस्कूल मिरज. या स्पर्धेत तब्बल २० अपंग विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सॉप्टबॉल थ्रोबॉलमध्ये पृथ्वीराज चिदानंत नंदीकोल, राहलु लकाप्पा कुंभार, अक्षय प्रकाश पाटील सर्व मिरज हायस्कूल यांचा समावेश आहे.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विन मुद्गल, माजी आमदार दिनकरतात्या पाटील, स्थायी समितीचे सभापती मकरंद देशपांडे, शिक्षण मंडळाचे सभापती प्रा.पद्माकर जगदाळे या मान्यवरांच्या उपस्थित झाले.



**शिक्षण मंडळाच्याशालेय क्रीडा स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी मुद्गल यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक सुरेश आवटी, हणमंत पवार, सभापती प्रा. पद्माकर जगदाळे, अनिल पाटील, मानसिंग शिंदे उपस्थित होते.**

# योजना शासनाची.....

# जननी सुरक्षा योजना



शासनाच्यावतीने सन २००६-०७ सालापासून शहरी भागामध्ये प्रजनन व बाल आरोग्य प्रकल्पांतर्गत जननी सुरक्षा योजना सुरू केलेली आहे. या योजनेंतर्गत शहरी भागातील झोपडपट्टी व गलीच्छ वस्त्यांमधील दारीद्र्य रेषेखालील व अनुसुचित जाती व जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थांमध्ये प्रसुतिचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे हा उद्देश आहे. या योजनेंतर्गत खालील प्रमाणे लाभ देण्यात येतो.

* योजनेचा लाभ दारिद्र्य रेषेखालील तसेच अनुसुचित जाती व जमातीतील मातांना दिला जातो.
* लाभार्थी महिलेचे वय प्रसुतीपूर्व नोंदणी करताना कमीतकमी १९ वर्षे असावे लागते.
* शहरी भागामध्ये प्रसुतिसाठी शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आरोग्य संस्थेत दाखल झालेल्या लाभार्थींचे प्रसुतीनंतर केंद्रातर्फे रू. ६००/- मात्र अनुदान ७ दिवसाचे आत देण्यात येते.
* सदर योजनेचा लाभ केवळ दोन जिवंत अपत्य असे पर्यंत देय आहे.
* लाभार्थीकडे पिवळे रेशनकार्ड नसल्यास वार्षिक उत्पन्न रू.२०,०००/- पेक्षा कमी असल्याचे मा.विद्यमान नगरसेवकांचा दाखला देणे आवश्यक आहे.

ही योजना केंद्रशासन पुरस्कृत योजना असून सदर योजनेंतर्गत गरोदर मातेस देण्यात येणाऱ्या अनुदानाचा उपयोग प्रसुतीचेवेळी व प्रसुतीनंतरच्या कालावधीत होणे अपेक्षित आहे. पर्यायाने जास्तीत जास्त बाळंतपणे दवाखान्यात होऊन माता-मृत्यू व बाल-मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी या योजनेचा उपयोग होणार आहे.

<u>या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींनी महापालिका आरोग्यकेंद्रे व शासकीय रूग्णालये येथे संपर्क साधावा.</u>

# नागरीकांना आवाहन

सांगली, मिरज व कुपवाड महापालिकेच्यावतीने सुरू करण्यात आलेले ''विकासवेध'' हे मुखपत्र आता लोकांच्यापर्यंत पोहचत असून त्यास नागरीकांतून चांगला प्रतिसाद मिळत आहे. महापालिकेच्या विविध विभागांची नागरीकांना ओळख व्हावी, कामकाजाविषयीची माहिती नागरीकांना मिळावी, महापालिकेचे विविध उपक्रम नागरीकांपर्यंत पोहोचावेत त्याचप्रमाणे महापालिकेच्या विकासकामांबाबत व उपक्रमांबाबत नागरीकांच्या अपेक्षा व प्रतिक्रिया जाणून घ्याव्यात आणि महापालिका व नागरीकांमध्ये लोकसंवाद साधला जावून विकासाकडे वाटचाल व्हावी, या उद्देशाने 'विकासवेध' मध्ये नागरीकांचा सहभाग अपेक्षीत आहे.

आपली मतं, विचार, प्रतिक्रिया व्यक्त करण्याचं 'विकासवेध' हे एक व्यासपीठ आहे. शहर व्यवस्थापन आणि विकासाशी संबंधित विषयांवर आपण 'विकासवेध' मध्ये लिहू शकता. 'विकासवेध' मधून प्रसिध्द होत असलेल्या साहित्यावर आपण आपल्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे व्यक्त करू शकता.

आपल्या प्रतिक्रियांच्या स्वागतासाठी आम्ही उत्सुक आहोत.

लेखन पाठविण्याचा पत्ता:
संपादक 'विकासवेध'
**जनसंपर्क अधिकारी कार्यालय**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
महापालिका मुख्यालय, शहर पोलिस स्टेशन समोर
सांगली ४१६४१६
दूरध्वनी : ०२३३-२३७३७२१ /२३७३७२२

ई-मेल : **smkcorporation@gmail.com**
वेबसाईट : **www.smkc.gov.in**
फक्त एसएमएस : ९०११०२९७३४

* आपण पाठविलेल्या प्रतिक्रिया व लेख प्रसिध्द करण्याचे अधिकार संपादकांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.



शिक्षण मंडळाच्याशालेय क्रीडा स्पर्धेच्या उद्‌घाटनावेळी जिल्हाधिकारी श्याम वर्धने, महापौर इद्रिस नायकवडी यांच्याहस्ते शांततेचे प्रतिक असलेली कबुतरे आकाशात सोडण्यात



मुलांच्या कबड्डी स्पर्धेत प्रतिस्पर्धी संघातील चढाईपटूची पकड करण्याच्या प्रयत्नातील खेळाडू



मुलींच्या कबड्डी स्पर्धेतील एक क्षण




**मा.मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुंबई येथे पुरस्कार स्विकारताना महापौर इद्रिस नायकवडी उपायुक्त विजय कुलकर्णी सोबत स्थायी समिती सभापती मकरंद देशपांडे, नगरसेवक राजू गवळी, वैद्यकीय अधिकारी डॉ. राम हंकारे, पाणी पुरवठा अभियंता पी. डी. भामरे आदी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.**

# संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानमध्ये

# महापालिकेस राज्यस्तरीय पुरस्कार

सन २००८-०९ सालामध्ये झालेल्या संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानमध्ये सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेस राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. या पुरस्काराचा वितरण समारंभ मा.मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दि.१२ मार्च २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे झाला.

महापालिकेच्यावतीने सदरचा पुरस्कार महापौर इद्रिस नायकवडी व उपायुक्त विजय कुलकर्णी यांनी स्विकारला. यावेळी स्थायी समिती सभापती मकरंद देशपांडे, नगरसेवक राजू गवळी, वैद्यकीय अधिकारी डॉ. राम हंकारे, पाणी पुरवठा अभियंता पी. डी. भामरे आदी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

अभियान कालावधीमध्ये आपल्या महापालिकेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी गट. क्र. २ (१० लाख पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महापालिकांचा गट) मध्ये 'ब' प्रतवारीमधुन 'अ' प्रतवारी प्राप्त केल्याने विशेष प्रमाणपत्र देऊन शासनाचेवतीने राज्यस्तरावर आपल्या महापालिकेस सन्मानित करण्यात आले.